I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 279-282 OPEN ACCESS e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)

A Double-Blind Peer Reviewed Journal Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES

© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# विद्यमान परिस्थितीत भारतीय बॅकींग क्षेत्रातील आव्हाने व संधी

प्रा. चंद्रशेखर नामदेव गौरकार

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

एस. बी. महाविद्यालय अहेरी, जि. गडचिरोली

*Corresponding Author: gaurkarshekhar@gmail.com

Communicated :20.02.2022 Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 Published: 30.03.2022

**सारांश :**

भारतातील बॅकींग उद्योग क्षेत्राचा इतिहास खुप मोठा आहे. ब्रिटिशांच्या काळापासून तर स्वातंत्र्योतर काळापर्यंत,पारंपारिक बॅकींग पध्दती पासून तर आधुनिक बॅकींग पध्दतीपर्यंत तसेच बॅकेच्या खासगीकरणापासून ते राष्ट्रीयीकरण आणि राष्ट्रीयीकरणा पासून तर खासगीकरणापर्यंत."विद्यमान परिस्थितीत आधुनिक तंत्रज्ञानाचा भारतीय बॅकींग क्षेत्रात वापर केल्यामुळे बॅकींग कार्यपध्दतीत आमुलाग्र बदल झाला त्यामुळे भारतातील बॅकींग उद्योगानांही बदलत्या परिस्थितीनुसार जागतिक बॅकींग क्षेत्रात टिकुन राहता आले. बॅकींग क्षेत्राचे महत्वाचे वैशिष्टये म्हणजे या संस्थेवरील लोकांचा विश्वास होय आणि आजही अनेक बॅका ग्राहकांचा विश्वास टिकवून आहे. तसेच या क्षेत्रात टिकुन राहण्याकरीता रोज नव–नवीन आव्हानांना समोर जात आहे. या संशोधनपर लेखात भारतीय बॅकींग क्षेत्राबाबत सामान्य लोकांत असलेली भावना, बॅकींग क्षेत्रासंबंधी असलेली आव्हाने आणि संधी शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. हा लेख तीन भागात विभागलेला असून पहिल्या भागात भारतीय बॅकींग क्षेत्राचा परिचय आणि संरचनेचा समावेश आहे. दुसऱ्या भागात भारतीय बॅकींग क्षेत्राला भेडसावणारे विविध आव्हाने आणि संधी या बाबत चर्चा करण्यात आली आहे. आणि तिसऱ्या भागात निष्कर्षाचा समावेश आहे. जागतीक बॅकींग स्पर्धेच्या युगात टिकून राहण्याकरीता भारतीय बॅकींग उत्पादन विपणन धोरण,आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर,राजकारण हस्तक्षेप विरहीत व्यवस्थापन इत्यादीवर त्वरीत भर देणे आवश्यक आहे. हा संशोधन पर लेख संशोधक, प्राध्यापक, राज्यकर्ते, धोरणकर्ते यांना उपयूक्त ठरणारा आहे.

**बीजशब्द :** ग्रामीण क्षेत्र, दिवाळखोरी, आभासी चलन, हस्तक्षेप, जोखीम.

**प्रस्तावना :**

विद्यमान परिस्थितीत असे दिसून येते की, भारतीय बॅकींग क्षेत्र दिवाळखोरी भष्ट्राचार, अकार्यक्षम, कर्ज संकट, लक्षणिय अकार्यशील पुंजी, आभासी चलन, वाढता राजकिय हस्तक्षेप या सारख्या गुंतागुंतीच्या काळातून जात आहे. कोविड–१९ मुळे जागतिक अर्थव्यवस्था मंदीसदृश बनली आहे. अशा परिस्थितीत बॅकिंग व्यवसायात टिकून राहणे, वाढ करणे आणि सतत विकास साधणे कठीण झाले आहे. अशा कठीण प्रसंगात परिस्थितीनूसार स्वत:त बदल घडवून आणून व्यवसायात टिकून राहण्याचे सामर्थ्य भारताच्या काही मोजक्याच बॅकामध्ये आहे.

भारतीय बॅकिंग उद्योग क्षेत्राच्या विकासाची गती लक्षणिय आहे. पत विस्ताराची उच्च गती, विकसीत बाजारपेठतील बॅकांप्रमाणेच नफा आणि उत्पादकता वाढविणे अकार्यक्षम मालमत्तेचे कमी प्रमाण आणि आर्थिक समावेशावर लक्ष केंद्रीत केल्यामुळे भारतीय बॅकिंग व्यवसाय क्षेत्र विद्यमान परिस्थितीत स्थिर आणि मजबूत झाले आहे. भारतीय बॅकिंग उद्योग क्षेत्राने स्वत:ला बदलत्या आव्हानात्मक परिस्थितीत तोंड देण्यासाठी नवसंकल्पना, नवतंत्रज्ञान वापरण्यास सुरूवात केली आहे. प्रस्तूत संशोधन लेखात विद्यमान परिस्थितीत भारतीय बॅकिंग उद्योग क्षेत्राला पुढे जाण्याकरीता असलेले विविध आव्हाने व संधी यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभुमी :**

भारतात बॅक व्यवसायाचे अस्तित्व फार पूर्वीपासून असून आधूनिक बॅक व्यवसायाला सुरूवात ब्रिटिश काळापासून झाली आहे. अठराव्या शतकात सुरू झालेला भारतीय बॅक व्यवसाय क्षेत्राचे महत्वाचे टप्पे पुढील प्रमाणे सांगता येतील.

**अ) स्वातंत्र्यपुर्व प्रगती :–**

१७७० मध्ये ॲलेक्झेंडर ॲड कंपनीने कलकत्यात 'बॅक ऑफ हिंदुस्थान' या नावाची भारतातील पहीली बॅक स्थापन केली. ऐकोणविसाव्या शतकाच्या सुरूवातीला इस्ट इंडीया कंपनीला संघटीत अशा व्यापारी बॅकांची गरज निर्माण झाली त्यामूळे या कंपनीने इलाखा बॅक स्थापन करण्यास सुरूवात केली. १८०६ मध्ये पहिली इलाखा बॅक 'बॅक ऑफ कलकत्ता', १८४० मध्ये दुसरी इलाखा बॅक 'बॅक ऑफ बॉम्बे' १८४३ मध्ये तिसरी इलाखा बॅक 'बॅक ऑफ मद्रास' या नावाने संपूर्ण भारतात एकून तिन इलाखा

बॅक स्थापन करण्यात आल्या. या तिन्ही इलाखा बॅकांना कागदी चलन छापण्याचा अधिकार देण्यात आला होता. मात्र तिन्ही बॅकांच्या चलनात फरक होता त्यामुळे हे चलन लोकप्रिय होऊ शकले नाही. त्यामूळे १८६२ मध्ये कागदी चलन छापण्याचा अधिकार ब्रिटीश भारत सरकारने स्वत:कडे घेतला. १८६५ मध्ये इलाहाबाद बॅक, बॅक ऑफ शिमला इत्यादीची स्थापना. १८८१ मध्ये 'अवध कमर्शियल बॅक' या नावाने भारतीयांनी मर्यादीत जबाबदारीच्या तत्वावर स्थापन करण्यात आलेल्या पहील्या बॅकेची स्थापना केली. १८९४ मध्ये लाला हरकिशन यांच्या प्रयत्नामुळे 'पंजाब नॅशनल बॅक' ची स्थापना केली ही संपूर्ण भारतीय मालकीची पहीली बॅक होय.


१९०५ मध्ये सुरू झालेल्या स्वदेशी चळवळीमूळे भारतीय बॅकांच्या स्थापनेला खऱ्या अर्थाने प्रोत्साहन मिळाले. १९०६ ते १९१३ या कालावधीत एकुण ९८ बॅका स्थापन झाल्या मात्र गैरव्यवस्थापन आणि बॅकींग व्यवसायाची तत्वे योग्य पध्दतीने न पाळल्यामुळे १९१३ ते १९१७ या कालावधीत एकुण ८७ बॅका बंद पडल्या. या दरम्यान भारतात एक मध्यवर्ती बॅक असावी असा दृष्टीकोण उदयास आला त्यामुळे १९२१ मध्ये एकुण तिन्ही इलाखा बॅकेचे रूपांतर इंपिरिअल बॅकेत करण्यात आले. मात्र १ एप्रिल १९३५ मध्ये भारताची मध्यवर्ती बॅक म्हणून 'रिझर्व्ह बॅक ऑफ इंडीया' ची स्थापना करण्यात आली.

**ब) स्वातंत्र्यानंतरची प्रगती :–**

भारतात कर्ज बुडीचे प्रमाण जास्त असल्याने व्यापारी बॅकांच्या कार्यपध्दतीवर कायदेशिर नियंत्रण आणण्यासाठी भारतीय संसदेने विविध प्रयत्न केले. १जानेवारी १९४९ ला 'रिझर्व्ह बॅक ऑफ इंडीया'चे राष्ट्रीयीकरण केले तर 'बॅकींग विनियमन कायदा १९४९' लागु करून या कायद्या व्दारे त्ठए चे नियंत्रण भारतीय बॅकांवर प्रस्थापित करण्यात आले. संयुक्त भांडवली बॅकांचे दोन भागात वर्गीकरण करण्यात आले.१)अनुसूचित बॅका २)बिगर अनुसूचित बॅका, दि बॅकींग कंपनीज(अमेंडमेंट)अॅक्ट १९६१नुसार त्ठए ला सरकारच्या परवानगीने बॅकांचे सक्तीने विलीनीकरण करण्याचा अधिकार मिळाला.१जुलै १९५५ मध्ये इंपिरिअल बॅकेचे रूपांतर 'स्टेट बॅक ऑफ इंडिया'मध्ये करण्यात आले. १९५९ मध्ये भारत सरकारने ैठए कायदा मंजुर केला त्यानुसार ८ संस्थानिकांच्या बॅका ैठए ने आपल्या ताब्यात घेतल्या त्यांना ैठएच्या सहयोगी बॅका म्हणुन ओळखण्यात येते.

१९६९मध्ये तत्कालीन अर्थमंत्री श्री.मोरारजी देसाई यांनी व्यापारी बॅकांवर सामाजिक नियंत्रण लादण्याचा निर्णय घेतला. १९ जुलै १९६९ मध्ये १४ तर १५ एप्रिल १९८० मध्ये ६ खासगी बॅकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. १९९१च्या नवीन आथिक धोरणामुळे भारतीय बॅक क्षेत्रात खासगीकरणाचे प्रमाण वाढु लागले.नवीन आथिक सुधारणा धोरणानंतर स्थापन झालेल्या बॅकांना नवीन खासगी बॅका असे म्हणतात. भारतीय बॅकांना स्वत:ची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी १९९४ मध्ये भारत सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील बॅकांचे आंशिक खासगीकरणाचे धोरण स्विकारले मात्र या धोरणानुसार भारत सरकारच्या मालकीचे प्रमाण ५१: पेक्षा कमी होणार नाही याची काळजी घेण्यात आली. कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचा विकास करण्यासाठी बॅकींग क्षेत्र हे अतिशय महत्वाचे आहे.आजपर्यत भारतीय बॅकींग क्षेत्रांनी विविध आर्थिक संकटांना तोंड दिले आहे. २००८–०९ मधील अमेरिकेचे आर्थिक संकट तसेच युरोपीयन संकट सुध्दा भारतीय बॅकींग व्यवसायाने पाहीले आहे. कोवीळ–१९ मुळे विद्यमान परिस्थितीत जागतिक अर्थव्यवस्थेची सर्वसाधारण परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. भारताच्या बॅकींग नियम व्यवस्थेने भारताला विविध आर्थिक संकटापासून दुर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. विद्यमान परिस्थितीत भारतीय बॅकींग क्षेत्रांतील आव्हाने व संधी समजुन घेण्यासाठी बॅकींग संरचना समजुन घेणे आवश्यक ठरते.

**भारतीय बॅक व्यवसायाची रचना :**




भारतीय बॅका सर्वोत्तम सामाजिक जाणिव आणि वचन बध्दतेसह राष्ट्राच्या विकासात सर्वोत्तम भूमिका पार पाडत आहे या सामान्य जनतेच्या आशा,आकांक्षाचे प्रतीक आहे. जनतेच्या अपेक्षा पुर्ण करण्यासाठी बॅक एक विकास संस्था म्हणुन कार्य करते. बॅकींग क्षेत्राची रचना आर्थिक आणि कायदेशिर अशा घटकांव्दारे निश्चित केली आहे. बॅकींग सेवांसाठी असलेल्या मागणीचा परिणाम बॅकींग संरचना आणि कार्यपध्दतीवर होतो.बॅकींग व्यवसाय हा जगातील सर्वात जास्त नियमन केलेल्या व्यवसायापैकी एक आहे. भारतीय बॅकींग व्यवस्थेने प्राचीन व्यवस्थेपासून आधुनिक

गतिमान व्यवस्थेपर्यंत खुप मोठा प्रवास केला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत बॅकींग क्षेत्र अतिशय महत्वाचे क्षेत्र असून 'रिझर्व्ह बॅक ऑफ इंडीया'च्या नियंत्रणाखाली कार्य करते.'रिझर्व्ह बॅक ऑफ इंडीया' अधिनियम १९३४ च्या नसार भारतीय बॅकांना अनुसूचित बॅक आणि बिगर अनुसूचित बॅक अशा दोन भागात विभागले आहे. यामध्ये सार्वजनिक, खासगी क्षेत्रातील बॅक, विदेशी बॅक, प्रादेशिक ग्रामीण बॅक इत्यादी भारतीय अर्थव्यवस्थेला अत्यंत उपयुक्त आणि व्यवहार्य असलेली बॅकींग रचना वरील तक्त्यात दर्शविली आहे.

**भारतीय बॅकींग क्षेत्रातील आव्हाने :—**

अलीकडच्या काळात भारतीय बॅकींग व्यवस्थेचे व्यापारीकरण तसेच खासगीकरण झालेले दिसून येते. भारतीय अर्थव्यवस्थेतील विद्यमान परिस्थितीत बॅकींग क्षेत्राची वाढती भूमिका, खासगीकणाचे वाढते प्रमाण जागतिक स्पर्धेच्या वाढत्या आव्हानामुळे बॅकांवर अनेक अपेक्षांच ओझ आहे. भारतीय बॅकींग क्षेत्रातील आजपर्यंतचा सर्वात मोठा 'ए.बी.जी.शिपयार्ड' घोटाळा, निरव मोदी, विजय माल्या या सारखे बॅक घोटाळे तसेच राजकीय वाढता हस्तक्षेप इ. भारतीय बॅकींग क्षेत्रापुढे अनेक समस्या निर्माण करीत आहे. भारतीय रिझर्व्ह बॅकेचे लक्ष आर्थिक स्थिरता राखून विकास साधण्यावर भर आहे परंतु विद्यमान परिस्थितीत कोवीळ—१९ मूळे भारतीय बॅकींग प्रणाली अनेक समस्या आणि आव्हानांचा सामना करीत आहे.

**१) व्यवस्थापन प्रणाली :—**

आधुनिक बॅकींग व्यवसायामध्ये जोखीम व्यवस्थापन हा एक अतिशय महत्वपुर्ण घटक आर.बी.आय ने बॅकांमधील मालमत्ता दायित्व व्यवस्थापन,जोखीम व्यवस्थापन प्रणालीवर मार्गदर्शक तत्वे तसेच क्रेडिट जोखीम व्यवस्थापन, बाजार जोखीम व्यवस्थापन आणि ऑपरेशनल जोखीम व्यवस्थापन इत्यादीवर मार्गदर्शक नोट्स प्रसिध्द केली आहे. विद्यमान परिस्थितीत भारतीय बॅकींग व्यवसायिक वातावरण जोखीम व्यवस्थापनासाठी एक व्यापक प्रणालीची गरज आहे.

**२) राजकीय हस्तक्षेप :—**

अलीकडच्या काळात भारतीय बॅकींग क्षेत्रात हजारो कोटी रूपयाचे बॅक घोटाळे झालेले समोर येत आहे .अशा घोटाळयांचा इतिहास पाहिल्यास या मागे राजकीय हस्तक्षेप दिसून येतो. त्यामुळे बॅकींग क्षेत्र पर्यायाने भारतीय अर्थव्यवस्था डबघाईस आल्याचे लक्षात येते. विद्यमान परिस्थितीत राजकीय हस्तक्षेपापासून बॅकींग क्षेत्र दुर ठेवणे हे एक मोठे आव्हान आहे.

**३) ग्राहक सेवा :—**

समानतेच्या तत्वानुसार सर्व ग्राहकांना बॅकींग सेवा प्रदान करणे अपेक्षित असते परंतू काही ग्राहकांच्या हिताचे संपूर्ण संरक्षण होत नाही. ए.टि.एम.मशिन किंवा ऑन लाईन व्यवहार करतांना व्यवहार यशस्वी न झाल्यास खात्यातून वजा झालेली रक्कम मिळवण्यासाठी ऑनलाईन आणि ऑफलाईन तक्रार करून सुध्दा लवकर रक्कम खात्यात जमा होत नाही अशा अनेक तक्रारीची योग्य दखल सुध्दा बॅक घेत नाही. भारतीय बॅकांकडुन ग्राहकांना त्वरीत न्याय मिळतील अशी व्यवस्था उभारणे अत्यंत आवश्यक आहे.

**४) ग्रामीण बॅकींग :—**

ग्रामीण भागात सहकारी बॅकांचे प्रमाण जास्त आढळुन येते. त्यामुळे ग्रामीण भागातील बॅकेत आधुनिक बॅकींग सेवांची कमतरता दिसुन येते. विद्यमान स्पर्धात्मक परिस्थितीत टिकुन राहायचे असेल तर आधुनिक बॅकींग सुविधा ग्रामीण भागात देणे हे एक आव्हान आहे.

**५) जागतिक स्पर्धा :—**

विद्यमान स्पर्धात्मक परिस्थितीत भारतीय बॅकींग क्षेत्रात जागतिकीकरणाचा प्रभाव वाढत आहे.जागतिक स्पर्धेला आव्हान देण्यासाठी भारतीय बॅकींग क्षेत्रांनी स्वत:ला सुसज्य ठेवणे आवश्यक बनले असुन आंतरराष्ट्रीय मानकानुसार कार्यपध्दतीही असणे आवश्यक आहे.

**६) पारदर्शकता :—**

पारदर्शकता आणि खुलासे यांच्या माध्यमातुन बॅकांच्या खऱ्या आर्थिक स्थितीचे वास्तववादी दर्शन घडुन येते. बॅकेची गुणवत्ता, नफा,जोखीम इ. संबंधीची माहीती मिळते. अशा पारदर्शकता व्यवहाराचा उपयोग अनेकांना होतो म्हणुन बॅकांनी पारदर्शकता जपली पाहीजे.

**७) तांत्रिक समस्या :—**

भारतीय बॅकेचे संगणक आणि इंटरनेटच्या माध्यमातुन कामकाज सुरू आहे. बॅकेचे अनेक कार्य आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने होते. परंतु भारतीय बॅकींग क्षेत्र आधुनिक तंत्रज्ञानाच्या बाबतीत कमी पडत आहे. ऑनलाईन व्यवहार करतांना अनेक तांत्रिक समस्या आढळुन येतात.

**८) शाखा विस्तार :—**

विद्यमान स्पर्धात्मक परिस्थितीत भारतीय बॅकींग व्यवसाय क्षेत्रात जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे विदेशी व खासगी बॅकींग शाखेचा विस्तार होत आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बॅकांना स्पर्धेत टिकुन राहण्याकरीता आपल्या बॅकींग शाखांचा विस्तार करणे आवश्यक आहे.

**९) ग्राहक मार्गदर्शक तत्वे :—**

आर्थिक कृती कार्य दलाने मनी लॉडरिंग विरोधी मानके आणि दहशतवादूयांना होणारा आर्थिक पुरवठा सारख्या

बाबींशी लढा देण्यासाठी शिफारशी वारंवार करण्यात येत आहे. समाजविरोधी व्यक्ती किंवा संस्था यांच्या मार्फत होणाऱ्या गैरवापरापासून स्वत:ला दुर ठेवण्याचे हे एक आव्हान भारतीय बॅकींग क्षेत्रापुढे आहे.

**१०) कॉर्पोरेट प्रशासन :—**

कॉर्पोरेट प्रशासनाच्या चांगल्या तत्वांच्या ऑपरेशनमध्ये प्राधान्यक्रम आणि प्रोत्साहनांचा समतोल राखला जात नाही अशा बॅकांसाठी असमतोल दुर करणे हे एक महत्वाचे आव्हान आहे. हे असमतोल दुर करण्याकरीता कॉर्पोरेट प्रशासनाच्या तत्वांचे कार्य वाढवुन ते मजबुत करणे यावर लक्ष देणे आवश्यक आहे.

**११) भारतातील बॅकांची समस्या आणि संभाव्यता :—**

नवीन आथिक सुधारणा धोरण नंतरच्या काळात जागतिकीकरण,खासगीकरण आणि उदारीकरणामुळे विद्यमान स्पर्धात्मक परिस्थितीत भारतीय बॅकींग व्यवसाय क्षेत्र विविध समस्या आणि आव्हानांना समोर जात आहे.

असे जरी असले तरी विद्यमान परिस्थितीत भारतीय बॅका काही धोक्यांना संधीमध्ये रूपांतरीत करून जास्तचे फायदे प्राप्त करून घेऊ शकतात.

५) भारतीय बॅकींग क्षेत्रा पुढे असलेली संधी :—

१) ग्रामीण भागात शाखांचा विस्तार करणे
२) व्यावसायिक दृष्टिकोन ठेवणे
३) अकार्यशिल भांडवलाचे व्यवस्थापन
४) जोखिम व्यवस्थापन करणे
५) आधुनिक बॅकींग सेवा प्रधान करण
६) कर्ज देण्याच्या प्रक्रियेत बदल करणे
७) ग्राहक संबंध सुधारणे
८) ग्राहकांना बचतीसाठी आकर्षित करणे
९) कुटीर,लघू इ. उद्योगांना वित्त पुरवठात प्राधान्य
१०) बॅकींग सुविधे पासुन वंचितांना बॅकींग सुविधा पुरविणे

**निष्कर्ष:**

असे चित्र स्पष्ट होते की नवीन आथिक सुधारणा धोरणानंतर भारतीय अर्थव्यवस्थेत बदल घडुन आलेला दिसून येतो ज्याचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम अनेक घटकांवर होतो. भारतात विद्यमान परिस्थितीत विकासाच्या नवीन संधी बरोबरच काही आव्हानेही उभी राहीली आहे. या संशोधन लेखात ग्रामीण बॅकींग, व्यावसायिक दृ ष्टिकोन, आधुनिक बॅकींग ग्राहक सेवा,जोखिम व्यवस्थापन यासारखे विविध आव्हाने आणि संधीची चर्चा केली आहे. जागतिक स्पर्धेला समोर जाण्यासाठी बॅका प्रयत्नशिल आहे म्हणुन जागतिक दर्जाचे आधुनिक तंत्रज्ञान, नवसंकल्पना यांचा स्विकार करून यानुसार आपले धोरण ठरविण्यास बॅकांनी सुरूवात केली आहे.

**सुचना:**

वरील चर्चेवरून आपल्याला असे म्हणता येईल की विद्यमान परिस्थितीत भारतीय बॅकींग व्यवसाय क्षेत्रासमोरील सर्वात मोठे आव्हान भारताच्या विशाल बाजारपेठेला सेवा प्रदान करणे आहे. ग्राहकांच्या गरजा चांगल्या रीतीने समजून घेऊन त्या गरजा पुर्ण केल्यास बॅकींग क्षेत्र अधिक यशस्वी होईल याकरीता भारतीय बॅकांनी आपले लक्ष बॅकींग सेवा सोबतच आपल्या ग्राहकांकडे देणे आवश्यक आहे. भारत सरकारने बॅकींग सेवांवर लावलेल्या वस्तू आणि सेवा कराचे प्रमाण अधिक असल्यामुळे याचा प्रतीकुल परिणाम बॅकींग क्षेत्रावर होतांना दिसून येतो. बॅकांनी वस्तू व सेवा कराचे प्रमाण कमी करण्यासाठी भारत सरकारकडे पाठपूरावा करून हे दर कमी करावे तसेच बॅकींग सेवांच्या किमतीत सुध्दा कपात करायला हवी. विविध आव्हानाना तोंड देण्यासाठी भारतीय बॅकांनी उत्पादन विषयक नवकल्पना स्विकराव्या तसेच जागतीक स्पर्धेच्या यूगात टिकून राहण्याकरीता आधूनिक तंत्रज्ञान स्विकारून आपला नफा वाढविण्यासाठी बॅकेच्या शाखांचा विस्तार करावा तसेच भारताबरोबरच जागतीक बाजारपेठेत सुध्दा भारतीय बॅकांचे वर्चस्व राहील या दृष्टीने प्रयत्न करायला हवे.

**संदर्भ :**

डी.एम.मिथानी,“मुद्रा बॅकींग एवं राजस्व”,हिमालया पब्लीशींग हाऊस मुंबई,(२००४)

एस.चन्द,“भारतीय अर्थव्यवस्था”,एस.चन्द पब्लीशींग नवी दिल्ली,(२०११)

वि.के.पुरी और एस.के.मिश्रा,“भारतीय अर्थव्यवस्था”, हिमालया पब्लीशींग हाऊस मुंबई,(२०१५)

रंजन कोळंबे,“भारतीय अर्थव्यवस्था”, भगीरथ प्रकाशन पुणे,(२०१३)

N.L.Sharma & Shubhanshu Shekhar, “Industry: Challenges and Opportunities”,G-Joural of Education,Social Indian Banking Science and Humanities (1) (1) : (2015) , pp.17-21

Dr.Uttam Kumar Purbey, “Industry:Challenges and Opportunities” , International Joural of Applied Research 6 (11) : (2020) , pp.309-313